बीड । मंगळवार
०४.०३.२०२५
वर्ष : ४ अंक : ३२५
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 





## जयराम चाटेने सरपंचांची पँट काढली तर घुलेची चेहऱ्यावरच लXX...


# कोणाचंही रक्त सळसळेल असे १० फोटो समोर






















*अजून कोणता पुरावा हवाय? संतोष देशमुखांना झालेल्या क्रूर मारहाणीचे फोटो*

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी आरोपपत्र दाखल केल्यानंतर अनेक नवीन गोष्टी समोर येत आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील टोळी पुरती अडकणार असल्याचे दिसून येत आहे.पोलिसांनी वाल्मिक कराड आणि इतरांविरोधात एक, दोन नव्हे तर जवळपास ६६ पुरावे जमवले आहेत. या चार्जशीटमध्ये पुरावे म्हणून हत्येच्या वेळची काही दृश्य, फोटो जोडली आहेत. यातून हत्येची क्रूरता दिसून येत आहे. वाल्मिक कराडच संतोष देशमुखांच्या हत्येचा मास्टरमाईंड असल्याचे समोर आले आहे. खंडणी, अ‍ॅट्रॉसिटी हत्या हे तिन्ही प्रकरण एकत्रित केले असून तिन्ही प्रकरण एकाच कारणातून घडल्याचा आरोप ही दोषारोप पत्रात करण्यात आला आहे. कट कुठे रचला याची माहिती आणि पुरावे सीआयडीच्या हाती लागले आहेत.

### ● कोणाचही रक्त सळसळेल असे १० फोटो

१. जनावराप्रमाणे मारहाण केल्यानंतर जयराम चाटेने संतोष देशमुखांची पँट काढली.
२. त्यावेळी दुसरा आरोपी महेश केदार हा देशमुखांची पँट काढताना त्याचा सेल्फी घेत होता.
३. अमानुष मारहाणीनंतर प्रतीक घुलेने देशमुखांच्या छातीवर दोन्ही बाजूला पाय टाकून चेहऱ्यावर लघवी करतोय
४. मारहाणीनंतर संतोष घुले देशमुखांच्या शेजारी उभा राहून फोटो काढतो.
५. जयराम चाटे देशमुखांच्या अंगावरचा शर्ट ओढून काढते आणि हातात धरून फिरवतो.
६. मारेकरी लाथा, बुक्क्या, पाईप आणि वायरने देशमुखांना मारहण करतात तसेच शिवीगाळ करतात.
७. वायरीसारख्या हत्याराचं बंडल देशमुखाच्या पाठीवर मारून वार केले
८. संतोष देशमुख मोठ्याने ओरडत असताना महेश केदार त्याचा व्हिडीओ घेत होता
९. सुदर्शन घुले हा सगळ्यांचा बाप आहे, असं देशमुखांना म्हणावं यासाठी जबरदस्ती केली जाते
१०. संतोष देशमुखांना फक्त अंतर्वस्त्रावर बसून पाठीवर पाईपने मारहाण केली जात होते.

### ● फॉरेन्सिककडून व्हिडीओची तपासणी ●

संतोष देशमुख हत्याप्रकरणातील चार्जशीटमध्ये हे फोटो जोडण्यात आले आहे. आरोपी मारहाण करतानाचे कोणतेही फोटो आणि व्हिडीओ अद्याप समोर आलेले नाही. मात्र ते फोटो आणि दृश्य कोणती आणि काय होती ? या संदर्भातील माहिती समोर आलेली आहे. कृष्णा आंधळेची मोकारपंती असा या व्हाट्सअ‍ॅप ग्रुपचं नाव होते. या ग्रुपमध्ये ५ ते ६ जणांनी संतोष देशमुख यांना कसं मारहाण होते हे पाहिले होते. फॉरेन्सिककडून हा व्हिडिओ सीआयडीला मिळाल्यानंतर त्याचे छोटे छोटे १० ते १२ व्हिडिओ तयार झाले आणि त्यातूनच या व्हिडीओमधील व्यक्ती आणि सीआयडीने या प्रकरणात ताब्यात घेतलेली व्यक्ती यांची फॉरेन्सिक तपासणी झाली. या व्हिडिओतील काही फोटो हे या आरोपपत्रात जोडण्यात आले आहेत.

---

**महाराष्ट्रात ईव्हीएमच्या विरोधात आणि ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेच्या समर्थनात**

## वामन मेश्राम यांची उद्या मूलनिवासी बहुजन समाज जोडो यात्रा बीडमध्ये होणार दाखल

**बीड शहरात विशाल जनसभेचे आयोजन ; भामुमोचे मधुकर काळे यांची माहिती**

**बीड । प्रतिनिधी**

ईव्हीएमच्या विरोधात आणि ओबीसींची जाती आधारीत जनगणना करण्याच्या समर्थनात भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा व राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा देशपातळीवर प्रबोधन आणि महाजागरण करुन राष्ट्व्यापीस्तरावर या संघटनांच्या माध्यमातून ९ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रव्यापी जेल भरो आंदोलनाची तयारी करत आहे. त्या अनुषंगाने भामुमोचे





राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या नेतृत्वामध्ये महाराष्ट्रात मूलनिवासी बहुजनन ▶▶ उर्वरित पान २ वर

---

## शिवसेनेच्या आढावा बैठकीस शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : शिवसेना जिल्हाप्रमुख सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब, शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब, शिवसेना ▶▶ उर्वरित पान २







---

# बीड जिल्ह्याची बदनामी थांबवा ; बीडचं पुणे होऊ देणार नाही

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंवर शेण आणि दगड फेकण्याचा ईतिहास असलेल्या पुणेकरांनी नाकाने कांदे सोलु नये ; सामाजिक कार्यकर्त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ. गणेश ढवळे**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा हा गुणवंतांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने कलाक्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात ,प्रशासकीय पातळीवर तसेच न्यायिक क्षेत्रांमध्ये एवढेच नव्हे तर सर्व क्षेत्रांमध्ये यशस्वी गरुड झेप घेतलेली आहे .स्नेहभाव जपणारा जातीय सलोखा जोपासणाऱ्या या बीड जिल्ह्याला काही लोक बदनाम करत आहेत.बीड जिल्ह्याची बदनामी थांबवा या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी आणि, कोथरुडचं बीड होऊ देणार नाही पुण्यामध्ये बीडची बदनामी करणा-या लागलेल्या फलकाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.०३ सोमवार



रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, पांडुरंग हराळे,शेख मुबीन, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे सहभागी होते. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

बीड जिल्हा हा गुणवंतांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने कलाक्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात, प्रशासकीय पातळीवर तसेच न्यायिक क्षेत्रामध्ये एवढेच नाही सर्वच क्षेत्रांमध्ये यशस्वी गरुड झेप घेतली

▶▶ उर्वरित पान २ वर

# म्हणूनच लोक नमितातार्ई मुंदडा यांच्या नेतृत्वावर प्रेम करतात..!



केज विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमिता अक्षय मुंदडा यांचा आज वाढदिवस. सर्वप्रथम, त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा..! अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने त्या सध्या मतदारसंघात नसल्या, तरी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव निश्चितच होणार आहे. केज, अंबाजोगाई, नेकनूर तसेच इतर प्रमुख ठिकाणी कार्यकर्त्यांनी शुभेच्छांचे बॅनर लावलेले दिसत आहेत. वाढदिवस म्हणजे जीवनातील एक वर्ष मागे पडले, असे जरी असले, तरी तो आत्म परीक्षणाचा आणि अवलोकनाचा दिवसही असतो. केज मतदारसंघाच्या राजकारणात मुंदडा घराण्याची सून म्हणून त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरूवात झाली. मात्र, स्व.विमलताई मुंदडा यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी अल्पावधीतच सामान्य लोकांची मने जिंकली. मनमिळावू आणि शांत स्वभाव, सोज्वळ वागणं - बोलणं, अंगी असलेली नम्रता या गुणांमुळे त्या खर्या अर्थाने भारतीय स्त्री संस्कृतीला शोभतात. आमदार असल्याचा किंचितही अहंकार त्यांच्या स्वभावात नाही. सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळून राहणे, संवादकौशल्य आणि प्रत्येकाची अस्थेवाईक चौकशी करणे या सद्गुणांमुळे केज मतदारसंघातील सर्व जाती - धर्मांचे लोक त्यांच्यावर प्रेम करतात. याच प्रेमाच्या बळावर त्या सलग दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्या. एका वाक्यात सांगायचे तर, त्यांनी मागील पाच वर्षांत विकासाच्या रूपाने जणू काही प्रयागराजच्या कुंभमेळ्यातून गंगाच आणली, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मुंदडा घराण्याची सून म्हणून त्या आल्या, तेव्हाच मतदारसंघाचे भविष्यातील नेतृत्व त्यांच्या हातात जाणार, याची चाहूल लागली होती. स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांनी तब्बल बावीस वर्षे मतदारसंघाचे नेतृत्व केले आणि जनसेवा हेच आपले ध्येय ठेवले. त्यांच्या निधनानंतर केवळ कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण मतदारसंघाची जबाबदारी आमदार नमितातार्ईंनी समर्थपणे स्वीकारली. मुंबईसारख्या महानगरातील शिक्षण घेतलेल्या एका मुलीने ग्रामीण भागात स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणे सोपे नव्हते. मात्र, भाजपा नेते नंदकिशोर मुंदडा आणि युवा नेते अक्षयभैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एक एक पाऊल सावधपणे टाकत सासूबाईंच्या वारशाला योग्य न्याय दिला. सुरूवातीला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काम केल्यानंतर २०१९ मध्ये पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने त्या भाजपात आल्या. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्या केज विधानसभा मतदारसंघातून निवडून आल्या. त्यावेळी महाविकास आघाडी सरकारच्या काळात विकासकामांसाठी निधी मिळविण्यात त्यांना अडचणी आल्या. मात्र, शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर अवघ्या अडीच वर्षांत त्यांनी केज मतदारसंघासाठी दोन हजार कोटी रूपयांपेक्षा अधिक निधी आणला. या निधीतून अंबाजोगाईच्या शहरात सिमेंट रस्ते इतके सुंदर झाले की, गल्ली बोळातदेखील अभूतपूर्व बदल झाले. 'असा विकास न भूतो न भविष्यति..!' असंच म्हणावं लागेल. यासोबतच त्यांनी अंबाजोगाई शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी विशेष प्रयत्न केले. नगरपरिषदेच्या उद्यानांचा विकास, योगेश्वरी मंदिर तीर्थक्षेत्र, आद्यकवी मुकुंदराज यांच्या वास्तूंचा विकास, हत्तीखाना आणि इतर ऐतिहासिक स्थळांचे पुनरूज्जीवन अशा विविध उपक्रमांत त्यांचा पुढाकार आहे. मतदारसंघातील रस्ते, विद्युतपुरवठा, कृषी वीज, रूग्णालये, बंधारे, सर्वधर्मीय देवस्थानांची पुनर्बांधणी आदी विकासकामे वेगाने सुरू आहेत. नुकतेच त्यांनी कृषी तंत्र विद्यालयातील वसतिगृहांसाठी ३० कोटी रूपयांचा निधी आणला आहे. अंबाजोगाई शहरातील पाणीपुरवठा प्रश्नासाठी त्यांनी २०० कोटी रूपयांची योजना मंजूर करून आणली, काळवटी साठवण तलावाची उंची वाढवण्याचा प्रयत्न केला आणि मतदारसंघातील अनेक मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहिल्या. नमिताताई या स्वतः आर्किटेक्ट असल्याने विकासकामांमध्ये त्यांची विशेष आस्था आहे. फक्त निधी मिळविणे नव्हे, तर त्या कामांची गुणवत्ता तपासणं आणि योग्य देखरेख करणं हा त्यांचा स्थायीभाव आहे. कोणतीही विकासकामे दर्जेदार असावीत, याकडे त्यांचे लक्ष असते. भ्रष्ट शासकीय अधिकाऱ्यांना जाब विचारून त्यांनी पारदर्शक प्रशासनाची गरज अधोरेखित केली. त्यांचे राजकीय जीवन हे सकारात्मक विचारधारेचे आहे. द्वेष, कट्टरता किंवा भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन काम करण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळेच केज मतदारसंघातील जनतेने त्यांना पुन्हा एकदा निवडून दिले. विधानसभेतही त्यांनी ऊसतोड कामगार, शेतकरी, क्रीडा, रस्ते, आरोग्यसेवा यांसारख्या विषयांवर प्रभावीपणे आवाज उठवला आहे. राजकारणात पारदर्शकता आणि जनसेवा या दोन बाबींवर त्यांचा कटाक्ष असतो. आमदार असूनही त्यांच्या वागण्यात गर्व नाही. विकासाची संकल्पना आणि निधी कसा आणायचा याचा त्यांना परिपूर्ण अभ्यास आहे. युवा नेते अक्षय मुंदडा त्यांना खंबीर साथ देत असून, शासकीय कामांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांची विशेष मदत होते. त्यांच्या नेतृत्वाची खासियत म्हणजे कुणाचाही द्वेष नाही, फक्त सकारात्मक भूमिकेतून विकासासाठी काम करणे.. त्यामुळे पक्षातील वरिष्ठ नेते माननीय मंत्री महोदया ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी त्यांचे अतिशय चांगले संबंध आहेत. त्यामुळे शासकीय योजनांचा पाऊस या मतदारसंघात पडत असतो. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत नुकतेच धर्मादाय खासगी रूग्णालयांच्या विधिमंडळ तपास समितीच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकूणच, 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या तत्वावर चालणाऱ्या नमितातार्ईंच्या नेतृत्वाखाली केज मतदारसंघाने विकासाच्या नव्या उंची गाठली आहे. जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचे स्थान अजून भक्कम होत आहे. त्यांच्या माध्यमातून केज मतदारसंघाला एक अभ्यासू, निःस्वार्थी आणि विकासाभिमुख नेतृत्व लाभले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ही त्यांच्या नेतृत्त्वाखाली पक्षाला मोठे यश मिळेल यात शंका नाही. अशा या केज मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या लाडक्या नेतृत्वास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

पान १ वरून पुढे...

## महाराष्ट्रात ईव्हीएमच्या ...

समाज जोडो यात्रा काढण्यात आली असून उद्या वामन मेश्राम यांची ही यात्रा बीडमध्ये दाखल होत आहे. यावेळी बीड शहरात विशाल जनसभेचे सांयकाळी ५ वाजता आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भामुमोचे मधुकर काळे यांनी दिली असून या जनसभेस बहुसंख्येने मूलनिवासी बहुजन समाजाने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, की बामसेफ भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा आणि राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाच्या वतीने देशातील मूलनिवासी बहुजन समाजामध्ये प्रबोधनाच्या माध्यमातून जागृती निर्माण करुन या संघटनांच्या माध्यमातून मूलनिवासीयांच्या हक्क-अधिकारांसाठी संघर्ष केला जात आहे. मात्र मूलनिवासी बहुजन समाजाच्या प्रश्नांचे मुळ हे ईव्हीमध्ये मशीन मध्ये दडल्याने त्यांच्या कोणत्याही समस्यांचे समाधान होतांना दिसत नाही. त्यामुळेच ओबीसींची जातनिहाय जनगणना होत नसल्याने ईव्हीएमच्या विरोधात आणि ओबीसींची जातनिहाय जनगणनेच्या समर्थनाथ तसेच बहुजन महापुरुषांच्या होणार्या अवमाना विरोधात जनजागृती करण्यासाठी भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा आणि राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाच्या वतीने महाराष्ट्रात वामन मेश्राम यांच्या नेतृत्वामध्ये महाराष्ट्रात परिवर्तन यात्रा काढली जात आहे. ही परिवर्तन यात्रा बीड शहरात उद्या मंगळवारी (दि.३) रोजी पोहचत असून त्यानिमित्ताने शहरातील नगररोडवरील हॉटेल निलकमलमध्ये सायंकाळी ५ वाजता जनसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेचे उद्घाटन महामानव प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्तात्रय विसवळे यांच्या हस्ते होणार असून मुख्य अतिथी शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, रत्नाकरअप्पा शिंदे, माजी नगराध्यक्ष सय्यद मोईन मास्टर, हाशमी सय्यद शफिक अहमद, शेतकरी संघटनेचे मोहनराव गुंड, अॅड. नरायण गोले, राष्ट्रवादी किसान सेलचे जिल्हाध्यक्ष ईनामदार चाँद पाशा, डॉ. रघुनाथ जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी या जनसभेस बहुसंख्येने

पान १ वरून पुढे...

उपस्थिती राहण्याचे आवाहन भारत मुक्ती मोर्चाचे मधुकर काळे यांनी केले आहे.

एप्रिलमध्ये जेलभरो आंदोलन तर जुलैमध्ये भारत बंद- ईव्हीएमच्या विरोधात आणि ओबीसींच्या जाती आधारीत जनगणनेसह अन्य महत्वपूर्ण मुद्यांवर भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा व राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा देशपातळीवर मूलनिवासी बहुजन समाजामध्ये प्रबोधन आणि महाजागरण करुन राष्ट्रीय स्तरावर या संघटनांच्या माध्यमातून ९ एप्रिल २०२५ रोजी जेल भरो आंदोलन तर ता.१ जुलै २०२५ ला भारत बंद करण्याची हक्क भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी दिली आहे. त्यापार्श्वभूमीवर या आंदोलनाची तयारी करण्यासाठी प्रबोधन आणि जागृतीसाठी महाराष्ट्रात मूलनिवासी बहुजन समाज जोडो ही परिर्वतन यात्रा राज्यात काढण्यात आली असून ठिक-ठिकाणी या परिवर्तन यात्रेला मूलनिवासी बहुजन समाजाचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून ईव्हीएम विरोधात या माध्यमातून मोठे जनआंदोलन छेडले जाणार असल्याचे दिसत आहे. त्याचीच भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी मोठ्या प्रमाणात तयारी केल्याचे बोलले जात असून या जनआंदोलनाच्या रेट्याने ईव्हीएम कायमचे हद्दपार होणार का ? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## शिवसेनेच्या आढावा....

मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभु साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दादा दानवे साहेब,शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूरकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामाजी जाधव साहेब यांचा दिनांक. ४/०३/२०२५ ते ६/०३/२०२५ रोजी बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी आढावा दौरा आयोजित करण्यात आला आहे तरी दिनांक ४ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव विधानसभा मतदारसंघातील तालुका धारूर, दुपारी १:३० वाजता तालुका वडवणी, दुपारी ३:३० वाजता तालुका माजलगाव व दिनांक ५/०३/२०२५

पान १ वरून पुढे...

रोजी सकाळी आष्टी विधानसभा मतदारसंघातील तालुका आष्टी येथे ११ वाजता, दुपारी १:३० वाजता तालुका पाटोदा, दुपारी ३:३० वाजता तालुका शिरुर येथे शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी, शिक्षक सेनेसह सर्व अंगीकृत संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित केली असून सदरील बैठकीस सहसंपर्कप्रमुख माजी मंत्री बदामरावजी आबा पंडित साहेब,लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे साहेब, सहसंपर्कप्रमुख लक्षराजजी सानप साहेब, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेबजी अंबुरे साहेब उपस्थित राहणार आहेत. तरी शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी, शिक्षक सेनेसह सर्व अंगीकृत संघटनांच्या पदाधिकारी, महिला आघाडी जिल्हा संघटीका, युवा सेना जिल्हा युवा अधिकारी, उपजिल्हाप्रमुख, जिल्हा संघटक, जिल्हा समन्वयक, विधानसभा प्रमुख, तालुका प्रमुख, उपतालुकाप्रमुख,शहर प्रमुख,गटप्रमुख शाखाप्रमुख,बूथप्रमुख सह सर्व पदाधिकाऱ्यांनी बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी केले आहे.

## बीड जिल्ह्याची बदनामी...

आहे.स्नेहभाव जपणाऱ्या जातीय सलोखा जोपासणाऱ्या या बीड जिल्ह्याला बाहेरच्या मीडियाने सर्वाधिक बदनाम केले आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड अमानुष असून मानवतेला काळीमा फासणारे आहे. या प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी बीडकरांची इच्छा आणि मागणी आहे. मात्र काही इलेक्ट्रॉनिक मीडियांनी बीड जिल्ह्यात येऊन जिल्ह्याच्या अस्मितेचे आणि एकात्मतेचे लचके तोडले आहेत.त्यामुळे बीड जिल्ह्याची प्रतिमा महाराष्ट्रात बिहार पेक्षा वाईट अशी जाणीवपूर्वक रंगवण्यात आली. एका घटनेने संपूर्ण बीड जिल्ह्यात वाईट ठेवण्याचा जो प्रकार सध्या सुरू आहे. तो थांबवणे गरजेचे आहे. बीड जिल्ह्याची बदनामी थांबवण्याची जबाबदारी आम्हा सर्व बीडकरांची आहे. तसेच बिघडलेले वातावरण पुन्हा एकच

पान १ वरून पुढे...

चांगले करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची गरज आहे या सामाजिक जाणिवेतून बीड जिल्ह्याची बदनामी थांबवावी या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०३ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

पुण्यात बीड जिल्ह्याच्या विरोधात बॅनर लागावे ही घटना अत्यंत हास्यस्पद आहे. साऱ्या ब्रह्मांडाचे ज्ञान केवळ आपल्याच मस्तकात आहे. अशा अविर्भावात राहणाऱ्या पुणेकरांनी निदान दुसऱ्यांना नाव ठेवणे बंद करून स्वतःच्या जिल्ह्याचा, गावचा विचार करावा पुण्याच्या स्वयंघोषित तज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाची बीडकरांना गरज नाही. पुण्यात दररोज केवळ महिलांवर नव्हे तर संपूर्ण मानवतेवर अत्याचार होताना पाहायला मिळतात. हेच पुणेकर कोथरूडचे बीड होऊ देणार नाहीत असे म्हणत पुणेकरांनी आता नाकाने कांदे सोडणे बंद करावे. विशेष म्हणजे ज्या स्वयंघोषित समाजसेवकांनी बीड जिल्ह्यात ठाण मांडून बीड किती भयानक आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यात स्वयंघोषित समाजसेवकांनी आता पुण्यामध्ये फिरून तेथील गल्लीबोळात दररोज काय होते हे महाराष्ट्र समोर आणावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

पुण्यामधील कोयता गँग अमली पदार्थांची तस्करी महिला वगैरे होणारे अत्याचार लोटमार मारामारी आणि पुण्याचा जर इतिहास जर पाहिला तर जोशी अभ्यंकर हत्याकांड, रंगा बिल्ला यांना पोसणारा ,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना शेण दगड मारणारा,महात्मा ज्योतिबा फुलेंवर मारेकरी घालणारा, दलितांच्या गळ्यात मडके आणि कमरेला खराटा बांधणारा ,महात्मा गांधींना मारणारा नथुराम यांना पोसणारा, पेशवाईत घटकंचुकी सारखे रंगेल अतिशय निर्लज्ज खेळ चाललेला आणि पुण्यात देशातील सर्वात जुनी आणि कुप्रसिद्ध अशी बुधवार पेठ आदीमुळे कुप्रसिद्ध असणाऱ्या पुणेकरांनी नाकाने कांदे सोलणे बंद करावे अशी संतप्त प्रतिज्ञा सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

पान ४ वरून पुढे...

## देशमुख मर्डर...

हत्याकांडाविरोधात बीडसह राज्यभरात मोठ आंदोलन सुरु आहे. संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक ठिकाणी मोर्चे निघाले होते. राज्य सरकारने या हत्या प्रकरणाच्या तपासासाठी सीआयडी आणि एसआयटीची स्थापना केली होती. मागच्या आठवड्यात सीआयडीने या प्रकरणी १४०० पानाच आरोपपत्र दाखल केलं. त्यानुसार वाल्मिक कराड या हत्येचा मास्टरमाइंड असल्याच सीआयडीने आपल्या आरोपपत्रात म्हटलं आहे. खंडणी उकळण्यामध्ये संतोष देशमुख अडथळा ठरत होते. म्हणून त्यांची हत्या करण्यात आली असं सीआयडीने आपल्या आरोपपत्रात म्हटलं आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर विविध नेत्यांनी, ग्रामस्थांनी अशाच प्रकारचे आरोप केले होते. आरोपपत्रात सुद्धा हेच नमूद असल्यामुळे त्यावर आता शिक्कामोर्तब होत आहे. सीआयडीच्या आरोपपत्रानुसार वाल्मिक कराडच संतोष देशमुख यांच्या हत्येमागचा मुख्य मास्टरमाइंड आहे.

## 12 मार्च 2025 पर्यंतच...

खरेदीची शासकीय तारीख ही १५ मार्च २०२५ असली तरी १३,१४,१५ दिवस हे सुट्टीचे आहेत. त्यामुळे या बाबींची नोंद घेत १२ मार्च पूर्वी कापूस विक्री करावी. ज्या शेतकऱ्यांचा कापूस विक्री करावयाचा राहीलेला असेल त्या सर्व शेतकऱ्यांनी एमआयडीसी मधील सिद्धी ॲग्रो, बहीरवाडी येथे कापूस विक्रीसाठी आणावा. विक्री वेळी सोबत ७/१२, कापसाचा पिकपेरा, आधारकार्ड इत्यादी आणावे. खरेदीची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत राहील असे आवाहन सभापती श्रीमती सौ. सरला कामराज मुळे व उपसभापती शामसुंदर पडूळे, संचालक धनंजय

पान ४ वरून पुढे...

गुंदेकर व सीसीआय केंद्र प्रमुख श्री. हर्षल पांडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

## रोटरी क्लब च्या...

या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे अध्यक्ष व मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक अँड. रवींद्र कानडे यांनी सांगितले की, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या माध्यमातून चालू वर्षांमध्ये अनेक सामाजिक सांस्कृतिक व समाज उपयोगी उपक्रमाचे आयोजन रोटरी द्वारे करण्यात येत आहे परंतु देशाचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेच्या युगामध्ये खचून न जाता. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे महत्व समजावे व त्यांचे मनोबल वाढून त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा करिता या परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची पडताळणी व्हावी व त्यांच्या गुणवत्तेनुसार त्यांना दिशा मिळावी हाच उद्देश आत्मसात करून या परीक्षेचे आयोजन करण्यात आले या परीक्षेत सर्वांना सहभाग नोंदवता यावा करिता कोणतेही शुल्क आकारन्यात आले नाही यापुढे देखील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवण्याचा मणस रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचां आहे असे सांगितले. याप्रसंगी रोटरी क्लब माजलगाव सिटीच्या सचिव सौ.लता जोशी, या उपक्रमाचे प्रमुख निरंजन वाघमारे, राजेश देशपांडे रोटरी क्लब माजलगाव सिटी चे सर्व सदस्य उपस्थित होते. या परीक्षेचा निकाल लवकरात लवकर जाहीर होईल असेही यावेळी सांगण्यात आले.या परीक्षा यशस्वी करण्यासाठी यशवंत विद्यालय माजलगाव व बुखारी विद्यालय माजलगाव चे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद तसेच मंगलनाथ मल्टीस्टेटचे कर्मचारी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

पान ४ वरून पुढे...

## डिजिटल मिडिया...

पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचे जाळे निर्माण करण्याचं काम हाती घेण्यात आले आहे. राज्यातील जवळपास २० जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यकारिणीच्या निवडी जाहीर केल्या गेल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांत सुध्दा या जिल्हा पदाधिकारी निवडी संदर्भात यंत्रणा उभी केली गेली आहे. येत्या काही दिवसांत एक व्यापक बैठक घेतली जाणार असुन या बैठकीची तारीख, वेळ आणि ठिकाण लवकरच कळवले जाईल. मराठी पत्रकार परिषदेची डिजिटल मिडिया परिषद ही विंग मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांनी तयार केली असून आपण त्यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रभर काम करत असल्याचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी सांगितले. या डिजिटल मिडिया परिषदेची राज्यस्तरीय पदाधिकारी निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही दिवसांत एक राज्यस्तरीय बैठक बोलावली जाणार आहे. आपणही यात सहभागी होण्यासाठी तसेच राज्य पदासाठी व जिल्हा पदासाठी इच्छुक असल्यास ९८२२५४८६९६ या वाटस अप नंबर वर आपला जिल्हा, आपली थोडक्यात माहिती व आपल्या माध्यमाची अर्थात यु ट्यूब किंवा पोर्टल ची लिंक पाठवावी. येत्या काही दिवसांत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे आणि राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही महत्वपूर्ण बैठक घेऊन डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या व जिल्हा पदाधिकारी यांच्या निवडी जाहीर केल्या जाणार आहेत. तरी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील यु ट्यूब चॅनल व पोर्टल चे संपादक

पान ४ वरून पुढे...

आणि पत्रकार बांधवांनी या बैठकीसाठी उपस्थित रहावे असे आवाहनही प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

## तहानलेल्या जीवाची...

गावकऱ्यातर्फ मनमंदिरचे संचालक माधव दादा पवार यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याविषयी माहिती देण्यात आली.यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरीक मधुभाआहेर ,रावसाहेब दादा देशमुख ,शरददादा आहेर ,महादेव काका औटी, शामरावदादा कापसे, शिवाजी दादा कापसे ,दिनकर पापा आहेत ,रावसाहेब बापू काळे, धान्य बँकेचे अध्यक्ष झेंडेकर सर, प्रसिद्ध व्याख्याते तथा आदर्श शिक्षक धर्मराज करपे सर, फरताडे उद्धव ,बिलीव्हर्स चर्चेचे फादर कापसे, अशोक तवले, गणेशदादा आहेर, सामाजिक कार्यकर्ते माऊली पिंगळे, कृष्णा सामसे,बप्पासाहेब काकडे ,संतोष पोकळे , गोकुळ वीर ,अरुणनाना कातखडे, इतर मान्यवर उपस्थित होते.

## आष्टी येथील ...

नेत्रदान करताना कोणकोणत्या पद्धती वापरल्या जातात याबद्दल सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच श्री संदीप पाटोळे यांनी रक्तदान किती महत्त्वाचे आहे एक रक्तदात्यामुळे तीन व्यक्तींना जीवदान मिळते , रक्तामधील असलेले वेगवेगळे घटक कशा पद्धतीने वेगळे केले जातात व कशा पद्धतीने त्याचा वापर केला जातो याबद्दल सविस्तर माहिती दिली. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विभाग प्रमुख श्री बोडखे वैभव व श्री निलेश नालकोल, सर्व सहाय्यक प्राध्यापक यांनी केले होते या कार्यक्रमाच्या शेवटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनी सर्व रक्तदात्यांचे व कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### ॲड.शेख इलियास यांची नोटरीपदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**



बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालयात वकीली व्यवसाय करणारे ॲड.शेख इलियास यांची भारत सरकारच्या विधी व न्याय मंत्रालयाच्या वतीने नुकतीच नोटरीपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे आप्तेष्ट, नातलग व समाजातून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### पीएमश्री जिल्हा परिषद शाळा पाली येथे विज्ञान कार्यशाळा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या जवळ असलेल्या पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली येथे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ व स्वाध्याय सेतू पुस्तिका निर्मिती मंडळाचे सदस्य विज्ञान प्रयोगशील शिक्षक श्रीयुत प्रवीण शिंदे सर यांचे हसत खेळत विज्ञान शिकू या यांचे कृतीतून विज्ञान व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सुरुवातीला प्रशाळेचे मुख्याध्यापक श्रीयुत लाड सर यांनी प्रवीण शिंदे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. १०० पेक्षा जास्त विज्ञान विषयाचे प्रयोग साध्या सोप्या सहज परिसरात उपलब्ध साधनसामग्री च्या साहाय्याने दाखवून मुलींना उत्तम मार्गदर्शन केले. हवेचा दाब ,पाणी बचतीचे महत्व ,अंधश्रद्धा निर्मूलन साठी काही रासायनिक अभिक्रिया करून जाळ लावून कसे फसवेगिरी केली जाते याचे मनोरंजक प्रात्यक्षिक करून मुलांना दाखवले. छोट्याशा कडीपेटीत १०० पेक्षा जास्त वस्तू कसे ठेवावे आणि पोस्ट कार्ड मधून अक्खा व्यक्ती कसा आरपार जातो हे कृती करून प्रवीण शिंदे सरांनी मुलांना दाखवले.साधे सोपे प्रयोग पाहून मुले भारावून गेली. या वेळी जेष्ठ विज्ञान शिक्षिका काब्दे मॅडम ,तळेकर सर ,आघाव सर ,म्हेत्रे मॅडम ,मुंढे मॅडम ,वाकचौरे मॅडम ,सांगळे मॅडम , खाडे मॅडम ,गलधर मॅडम ,मुळे मॅडम ,जाधव मॅडम ,सुमैय्या मॅडम ,पायके सर ,डोंगर सर ,राठोड सर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.राठोड यांनी केले.प्रास्ताविक काब्दे मॅडम यांनी करून आभार म्हेत्रे मॅडम यांनी मानले.

# पाचेगावात पाणी प्रश्न अतिशय गंभीर

## ग्रामपंचायत कार्यालय कार्यालयाचे दुर्लक्ष

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील २१ किलोमीटर अंतरावर असलेल्या पाचेगाव या गावात जवळपास अडीच हजार लोकसंख्या आहे मात्र या गावात पाणी प्रश्न अतिशय गंभीर झाला असुन ग्रामपंचायत कडून वेळेवर पाणीपुरवठा न केल्यामुळे महिलांची पाण्यासाठी भटकंती होत आहे .तेथील नागरिकांना सध्या कडकडीत उन्हाळा सुरू झाला असून त्याकरिता जारचे पाणी विकत घेऊन आपली तहान भागवावी लागते तरीही यावर ग्रामपंचायत प्रशासनाने अद्याप पाणी प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न देखील केला नाहीं पाचेगाव मध्ये होणांऱ्या पाणीपुरवठा मध्ये सध्या कमालीचा विस्कळीतपणा आला असल्याने पिण्याचा पाणी प्रश्न पंधरा दिवसातून एकदा पुरवठा केला जातो. त्यामुळे नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे विस्कळीत पाणीपुरवठ्याला ग्रामपंचायत जबाबदार असून नागरिकांची पाण्यासाठी भटकंती



याच प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे सुरू आहे असा आरोप जनतेतून होत आहे. सध्या नागरिकांना पिण्यासाठी जार तर सांडपाण्यासाठी टँकर विकत घ्यावे लागते आकाराण आर्थिक भुर्दंड सोसावे लागत असुन पाण्याचे स्त्रोत आटू लागल्याने टँकरचे भाव वाढले आहे त्यामुळे विकतचे पाणी घेणे ही नागरिकांना परवडत नाही म्हणून सामान्य जनतेने करायचे तरी काय असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. पाचेगावच्या विस्कळीत पाणीपुरवठ्याला ग्रामपंचायत व संबंधित सरपंच उपसरपंच व कर्मचारी तेच जबाबदार असल्याने नागरिकांना पाणीपुरवठा व मूलभूत सुविधा देण्यासाठी त्यांनी यापुढे प्रयत्न करावेत असे बोलले जाते. पंधरा दिवसाला एकदा येणाऱ्या पाण्यामध्ये कचरा व घाण येत असून त्यावर तवंग निर्माण होत आहे तर त्या पाण्याचा विशिष्ट प्रकारचा वासही येत आहे असे नागरिकांचे म्हणणे आहे. पाचेगाव येथील सामान्य जनतेचे पाण्यासाठी होत असलेले हाल ग्रामपंचायत व प्रशासनाने लक्षात घ्यावे त्यावर तात्काळ उपयोजना राबवून विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत करावा आणि नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी एक मुखी नागरिकांकडून होत आहे.

## अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या प्रदेश सरचिटणीसपदी ॲड. सुभाष राऊत यांची निवड

### माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान



**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची राज्य कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. भुजबळ फार्म नाशिक येथील कार्यालयात माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी राज्यासह देशात अखिल भारतीय महात्मा फ ुले समता परिषदेची ताकद अधिक वाढवण्यासाठी समता परिषदेच्या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी जोमाने काम करावे. राज्यातील सर्व ओबीसींचे संघटन करून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्राधान्य द्यावे असे आवाहन माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांनी यावेळी केले. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या कार्यकारणीमध्ये प्रदेश कार्याध्यक्षपदी बापूसाहेब भुजबळ, आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश कार्यकारणी मध्ये एकूण ३२ पदाधिकाऱ्यांचा सम ावेश आहे. कार्यकारिणीमध्ये प्रदेश सरचिटणीसपदी मुस्लिम ओबीसी समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, तेली समाजाचे नेते ईश्वर बाळबुधे, दिलीप खैरे, ॲड.सुभाष राऊत, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

#### ॲड. सुभाष राऊत यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत

**समता सैनिक ते अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस या पदापर्यंत पोहोचणारा ॲड. सुभाष राऊत हा एकमेव एकनिष्ठ कार्यकर्ता असून त्यांना न्याय मिळाल्याबद्दल भाऊ त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. आजतागायत ॲड. सुभाष राऊत यांनी समता सैनिक, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष, बीड नगरपालिकेचे नगरसेवक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य, समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष. राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) अशी विविध पदे भूषविली असून अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये छगनराव भुजबळ साहेब यांचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून ख्याती मिळवलेली आहे. समता परिषदेच्या प्रदेश सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल त्यांनी समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय छगनराव भुजबळ साहेब, नूतन कार्याध्यक्ष पंकजभाऊ भुजबळ, समीरभाऊ भुजबळ यांचे आभार व्यक्त केले असून ॲड. सुभाष राऊत यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्रात सर्वत्र अभिनंदन होत आहे.**

## देविदास गेणाजी हजारे यांना सेवापूर्तीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये निरोप समारंभ

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ.बाबासाहेच आंबेडकर विद्यालयामध्ये प्रयोगशाळा परिचर देवीदास गेणाजी हजारे यांना सेवापूती निमित्त आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमूत यांच्या अध्यक्षतेखाली सचिव ॲड. व्ही.बी. मगर, सर्व संचालक, माजी मुख्याध्यापक व्ही.जी. आवाड, लक्ष्मणराव शिंदे, या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीम ध्ये सहपरिवार सत्कार करून निरोप समारंभ संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी देविदास गेणाजी हजारे यांचा सहपरिवार शाल, श्रीफळ, पुष्पहार पोशाख प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष बी.एस.धुतालमल सचिव ॲड. व्ही.बी. मगर, माजी मुख्याध्यापक व्ही.जी. आवाड, मुख्याध्यापक बी.ए. हावळे आणि शिक्षक विजय देशमुख यांनी सेवापुर्ती निमित्त देविदास गेणाजी हजारे यांना भविष्यकाळासाठी शुभेच्छा देवून मनोगत प्रगट केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.ए. हावळे, संचलन संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यु. एस.वाघमारे यांनी केले. यावेळी आर.बी. घुले, श्रीमती एन.जी.म ुंडे, यु.बी.पवळ हे शिक्षक, आनंद छात्रालयाचे अधिक्षक डी.व्ही. खरसाडे, शिक्षकेत्तर कर्मचारी एल.बी.हजारे, भारत कोळेकर, सुभाष गायकवाड यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी, हितचिंतक, पालक, नागरीक उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार प्रदान केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यांत जामीन मंजूर; ॲड. अक्षय मुळे यांचा युक्तिवाद ग्राह्य

### घोडकाराजूरी फाट्यावर पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या 3 तरुणांना एस टी बसने चिरडल्याचे प्रकरण

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस भरती करणाऱ्या तीन तरुणांना एसटीने चिरडल्याची घटना पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. या प्रकरणी एसटीचे चालक कुलदीप मुसळे यांच्याविरुद्ध सदोष मनुष्य वधाचा गुन्हा पिंपळनेर पोलीस ठाण्यात दाखल झालेला आहे. या प्रकरणाचा युक्तिवाद ॲड. अक्षय मुळे यांनी केला. न्यायालयाने त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी कुलदीप मुसळे यांना जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणी अधिक माहिती अशी की ेकुळ नवनाथ घोडके वय २८ वर्षे व्यवसाय शेती व हॉटेल चालक रा. घोडका राजुरी ता.जि बीड यांनी समक्ष पोलीस ठाणे पिंपळनेर येथे हजर येवुन फिर्याद दिली की बीड ते परळी जाणारे रोड लगत घोडका राजुरी शिवारात स्वराज नावाचे हॉटेल येथे सकाळी ५ वा सुमारास साफसफाई करत असतांना १९/०१/२०२५ रोजी सकाळी ५ ०५.३० वा सुमारास माझ्या हॉटेलचे समोर माझा पूतण्या नामे १) ओम सुग्रीव घोडके व आम च्या गावातील २) विराट बब्रुवान घोडके ३) सुबोध बाबासाहेब मोरे ४) अदित्य बळीराम डरपे ५) अदित्य लक्ष्मण घोडके सर्व रा. घोडका राजुरी असे घोडका राजुरी ते पिंपळगाव मोची फाटा ईथपर्यंत नेहमीप्रमाणे रनिंग करून माझे हॉटेल



समोर रोडच्या बाजूला व्यायाम करत थांबलेले होते. मी माझ्या हॉटेल समोर साफसफाई चे काम करत होतो. सकाळी ०६.१० वा सुमारास बीड ते परळी जाणारे रोडने बीड कडून एक एसटी बस आली व रोड सोडून एसटी बस रोडच्या डाव्या बाजूच्या पंख्यावर येऊन तेथे व्यायाम करणारे आमच्या गावातील मूलांना जोराची धडक दिली त्यावेळी सदर बस।) ओम सुग्रीव घोडके २) विराट बब्रुवान घोडके ३) सुबोध बाबासाहेब मोरे सर्व रा घोडका राजूरी ता जि बीड यांचे अंगावर एसटी बस गेली. तेंव्हा त्या चालकाने त्या ठिकाणी बस उभा न करता त्यांना फरपटत गाडीचे खाली ओढत घेऊन गेला. त्यामूळे त्यांना गंभीर दुखापत व अंगाचा चेंदामेंदा होऊन १) ओम सुग्रीव घोडके व आमच्या गावातील २) विराट बब्रुवान घोडके हे जागीच मरण पावलेले दिसले व सूबोध बाबासाहेब मोरे हा जिवंत होता त्याची हालचाल सूरू होती. सदर मूलासोबत असलेले ४) अदित्य बळीराम डरपे ५) अदित्य लक्ष्मण घोडके सर्व रा. घोडका राजुरी ता जि बीड यांनी एसटी बस अंगावर येत असल्याचे पाहून त्यांनी रोडच्या बाजूला उड्या मारल्याने ते पण जखमी झालेले आहेत. त्यानंतर अपघात करून गेलेली एसटी बस च्या चालकाने एस टी बस तेथून पूढे इंग्लीश स्कूल जवळून वळऊन पून्हा बीड कडे वेगाने जात असताना दिसला त्यावेळी मी रोडवर येऊन एसटी एसटी बस क्रमांक MH14BT1473 ही बीड वरून परभणी येथे जात होती व तिचा चालक कूलदिप देविदास मूसळे बॅच नंबर १७९८५ हा असल्याचे समजले आहे. घटनेमध्ये जखमी झालेले मूले खूप घाबरलेले असल्याने व मी सदरची घटना समक्ष पाहीली असल्याने एसटी बस चालकाविरुध्द गोकुळ नवनाथ घोडके यांनी तक्रार दिली होती. यांच्या तक्रार चालक कुलदीप मुसळे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आले. या प्रकरणी ॲड. अक्षय मुळे यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरून आरोपीला गुन्ह्यांत जामीन मंजूर केला. या प्रकरणी मार्गदर्शन ज्येष्ठ विधिज्ञ के. एस. पंडित साहेबांनी केले तर ॲड. अभिजीत कदम, ॲड. यशवंत जगताप यांनी सहकार्य केले.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३९२/ २०२५, वृंदावणी व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी रामा पि. बाबु शिंदे, हे दिनांक ०१.०१.२०२५ रोजी उमरी ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी, १. वृदांवणी भ्र. रामा शिंदे, वय – ५२ वर्षे, धंदा – घराकाम रा. उमरी ता. जि. बीड, २. रमेश पि. रामा शिंदे, वय – ३९ वर्षे, धंदा – मजुरी रा. उमरी ता. जि. बीड, ३. विलास पि. रामा शिंदे, वय – ३६ वर्षे, धंदा– मजुरी रा. उमरी ता. जि. बीड, ४. विदया भ्र. गणेश धुरंधरे, वय – ३२ वर्षे, धंदा – घराकाम रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड, ५. छाया भ्र. विलास थोरात, वय – ३३ वर्षे, धंदा– घराकाम रा. जय मल्हार सायकल मार्ट, यशवंत नगर, पुणे, ता. जि. पुणे.

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताची मुले तर, अर्जदार क्र. ४ व ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०५.०४.२०२५ ही आहे.** आज दिनांक ०१.०३. २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(ॲड. पी. बी. वैरागळ यांचे मार्फत)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

## ज्ञानसाधना जीनियस स्कूलचे पहिले वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

### ज्ञानसाधना जिनियस स्कूल ही शाळा इतर शाळेसाठी आदर्श मॉडेल ठरेल : गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील ज्ञानसाधना जीनियस स्कूलचे पहिले वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार दि.०१ मार्च २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन वडवणी येथील गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे व मा.सुरेंद्र रणदिवे संगणक प्रोग्रामर शिक्षण विभाग बीड यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय म ाजी आमदार केशवराव आंधळे तसेच मा.भारत जगताप,उपनगराध्यक्ष बन्सीधरराव मुंडे, संपादक तथा डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिलजी वाघमारे,पत्रकार संघाचे वडवणी तालुका अध्यक्ष अशोक निपटे,पत्रकार हनुमंत मात्रे,पत्रकार वाजेद पठाण,मानव विकास योजनेचे बीड जिल्ह्याचे प्रमुख डांबे,डीजीएसचे संस्थापक डॉ.विजयकुमार निपटे,अशोक आजबे,सुनील कुलकर्णी,प्रशांत तोष्णीवाल व प्राचार्य देवराज प्रधान आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

अशोक आजबे सर यांनी शाळेतील विद्यार्थी कसी प्रगती करत आहेत याबद्दल माहिती दिली तसेच संपादक अनिलजी वाघमारे यांनी मैं खोज हुँ। मैं विचार हुँ। मैं सत्य का प्रसार हुँ। मैं पत्रकार हुँ।असं म्हणत डिजिटल मीडिया पत्रकार संघाचा प्रदेशाध्यक्ष डिजिटल शाळेला खूप खूप शुभेच्छा देतो असे ते म्हणाले,उपनगराध्यक्ष बन्सीधरराव मुंडे तसेच





माजी आमदार केशवराव आंधळे,मा.भारत जगताप यांनी आपले विचार व्यक्त करून डीजीएस शाळेला शुभेच्छा दिल्या.मा.सुरेंद्र रणदिवे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील इतर शाळा या शाळेला भेट देतील इतकी आदर्श शाळा भविष्यामध्ये ज्ञानसाधना जीनियस स्कूल ठरेल तसेच गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे म्हणाले की,आपल्या मराठीत एक मन आहे बाळाचे पाय पाळण्यात दिसतात मी म्हणेल बाळाचे पाय शाळेत दिसतात शाळेत गेलेले बाळाच भविष्यामध्ये प्रगती करू शकते आपल्या मुलांचे सुप्तगुण ओळखा त्याला चालना द्या त्यामध्ये ते करिअर करू शकतात वार्षिक स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या सुप्तकलागुणांना चालना मिळते असे बोलून डीजीएस शाळेला शुभेच्छा दिल्या.

अखंड हिंदुस्तानच आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कलाविष्कारांनी वार्षिक स्नेहसंमेलना प्रारंभ झाला लेझीम,म हाराष्ट्रातील संस्कृती,लोकगीते,लावणी,प्रयाग राज कुंभमेळा तसेच मराठी हिंदी चित्रपटातील गाण्यावर विद्यार्थी बालकलाकारांनी अभिनय व नृत्य केले या कलागुणांना पालकांनी,प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटामध्ये दाद दिली.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य देवराज प्रधान यांनी केले तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अमोल राठोड व भागवत गोंडे सर यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार सुनील कुलकर्णी सर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डीजीएस शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# देवपिंपरी व कोमलवाडी गावच्या पोस्टमनचा हलगर्जीपणा; नागरिक त्रस्त!

## पोस्टमनच्या हलगर्जीपणामुळे ग्रामीण भागातील 'पोस्टसेवा' खंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात टपाल गाडी येऊन गेल्यावर गल्लीतले लोक पोस्टमन येण्याची वाट पहात होते पोस्टमनच्या हाती पत्र आणि अनेक कार्डाचा एवढा गठ्ठा असायचा की तो त्याला हातात धरणे कठीण जात असल्यामुळे थैलीत घालून न्यावा लागत होता कुठल्याही कामासाठी पत्र, मनीऑर्डर, पार्सल अशा विविध सेवा देणारे खाकीतील पोस्टमन म्हणजे टपाल विभागाचीजीवनवाहिनीच आहे. नागरिक आणि टपाल विभागातील एक जिव्हाळ्याचा दुवा म्हणूनच पोस्टमनकडे पाहिले जाते.

ग्रामीण भागातील पोस्ट कार्यालयांची अविरत सेवा सुरू असल्याने सामान्य जनतेला आधार मिळत होता मात्र आता गेवराई तालुक्यातील अनेक ग्रामीण भागांत असलेले पोस्ट कार्यालयांची अविरत सेवा बंद झाली की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. देवपिंपरी व कोमलवाडी या गावचा पोस्टमन अविरत सेवा देत नसल्याने लोकांची कामेही रखडली आहेत. सामान्याचे टपाल ,पार्सल, त्याचबरोबर पोस्टांनी येणारे एटीएम कार्ड, चेक बुक, महत्त्वाचे कागदपत्रे, वेळेवर पोहोच करून नागरिकांना आधार देत नाहीत. संबंधित पोस्टमनकडे देवपिंपरी, व तांडा, महादेव तांडा तसेच कोमलवाडी हे गावे आहेत. त्यांच्या कर्तव्यप्रमाणे काम करत नसल्याने तसेच कामात हलगर्जीपणा करत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. आज रोजी आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात ऑनलाइनच होत असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना एटीएम कार्ड, चेक बुक चा आधार ठरत आहे मात्र पोस्टमनच्या हलगर्जीपणामुळे वेळेवर नागरिकांना शासकीय कागदपत्रे मिळत नाहीतच पण नागरिकांना भुर्दंड सहन करत नव्याने आपले काम करण्याची वेळ येत असल्याची संतापजनक प्रकार समोर आला आहे. गेल्या अनेक दिवसापासून लोकांच्या तक्रारी येत



होत्या परंतु पोस्टमन अविरत सेवा देण्याच्या ऐवजी मेवा खाण्यात मग्न होते. बँकेसंबंधी बजावण्यात आलेल्या नोटीसा वेळेवर न मिळाल्यामुळे अनेक नागरिकांना त्यांचा फटका बसला अनेकांवर संबंधित बँकेकडून कारवाया झाल्या याला जबाबदार कोण पोस्ट कार्यालय राहील का? म्हणून सातत्याने सुरू असलेली पोस्ट सेवा अशा हलगर्जी करणाऱ्या पोस्टमनच्या हातात दिली हे दुर्दैव त्यामुळे वरिष्ठांनी तात्काळ लक्ष घालून संबंधित पोस्टमन यांच्यावर कडक शासन करावा अशी मागणी होत आहे.

---

### थोडक्यात

#### डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ स्तरीय महाविद्यालय अनुपस्थिती सर्वेक्षणाचा प्रशिक्षण वर्ग संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची प्रदेश कार्यकारणीची बैठक नुकतीच नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथे पार पडली. या बैठकीमध्ये महाविद्यालयांमधील वाढत जाणाऱ्या अनुपस्थितीचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय प्रदेश कार्यकरणीने पारित केला.याच अनुषंगाने अभाविप देवगिरी प्रदेशाच्या वतीने महाविद्यालय अनुपस्थिती सर्वेक्षण ५ ते १५ मार्च या कालावधीमध्ये करण्यात येईल. हे सर्वेक्षण शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुख ६ घटकांसाठी करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, पालक ,संस्थाचालक, विद्यापीठ अधिकारी यांचा समावेश असेल. देवगिरी प्रदेशात येणाऱ्या ११ जिल्हे व प्रमुख ५ विद्यापीठांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर परिक्षेत्रातील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण बीड येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक महाविद्यालयात सोमवारी दि. ०३ मार्च रोजी पार पडले. या प्रशिक्षण वर्गामध्ये छ.संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव या जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा.डॉ. सचिन कंदले, प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे, प्रदेश संघटन मंत्री श्री.सिद्धेश्वर जी लटपटे, प्रदेश सहमंत्री ऋषिकेश केकान, सर्वेक्षण प्रांत प्रमुख स्वप्नील बगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी रुईकर, संध्या बेहरे, राघवेंद्र कुलकर्णी, आशिष वारे, अजय शिंदे, तुषार घुले, सार्थक कडू आदी कार्यकर्त्यांनी कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी कार्य केले.

#### आष्टी येथील फार्मसी कॉलेजमध्ये रक्तदान शिबिर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती व्याख्यान संपन्न



**केज । प्रतिनिधी**

आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च , आष्टी (डी .फार्म , बी. फार्म आणि एम .फार्म ) या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त रक्तदान शिबिर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबिर व्याख्यानाचे आयोजन केले होते या शिबिरामध्ये अष्टविनायक ब्लड बँक अहिल्यानगर यांनी सहभाग नोंदवला व रक्त संकलन करण्याचे काम केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.डी बी राऊत , प्रमुख पाहुणे नेत्रतज्ञ डॉ.चंद्रकांत गोसावी व अष्टविनायक ब्लड बँकेचे व्यवस्थापक श्री संदीप पाटोळे हे होते. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. डी बी राऊत सर यांनी सांगितले की रक्तदान करणे ही एक आपली सामाजिक बांधिलकी आहे तसेच नेत्रदानामुळे दोन व्यक्तींना पुन्हा जग पाहता येते या याविषयी मनोगत व्यक्त केले, डॉ.चंद्रकांत गोसावी यांनी नेत्रदानाचे महत्त्व काय आहे ▶▶ उर्वरित पान २ वर

---

## देशमुख मर्डर प्रकरणातील , सोनवणे ला जामीन मंजूर!

**केज । प्रतिनिधी**

मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी सिद्धार्थ सोनवणे याला केज न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. तपास यंत्रणेने दाखल केलेल्या आरोपपत्रात सोनवणे याचे नाव वगळण्यात आले होते, त्यानंतर सोमवारी त्याला जामीन मंजूर करण्यात आला.

सीआयडीने आरोपपत्रातून सिद्धार्थ सोनवणेला वगळल्यानंतर त्याला जामीन मंजूर करण्यात आलाय. मकोका गुन्ह्यातला हा पहिलाच जामीन मंजूर झाला आहे. मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर महिन्यात अत्यंत निर्घुणपणे हत्या करण्यात आली होती. या ▶▶ उर्वरित पान २ वर

### कोण–कोणावर मकोका अंतर्गत कारवाई?

**संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे, जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले, विष्णू चाटे आणि सिद्धार्थ सोनवणे यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई केली होती. सरपंच देशमुख हत्या प्रकरणात पहिला जामीन मंजूर झाला आहे. आरोपी सिद्धार्थ सोनवणेला केज कोर्टाने जामीन मंजूर केला आहे. २५ हजारांच्या जातमुचालक्यावर जामीन मंजूर केला आहे. सिद्धार्थ सोनवणेविरोधात पुरावे नसल्याने सीआयडीने आरोपपत्रात त्याच्या नावाचा समावेश केला नव्हता.**

---

## धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान ची बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

गाव देवठाणा तालुका धारूर जिल्हा बीड येथे धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व मराठवाडा संपर्क प्रमुख आण्णासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली बैठक संपन्न होऊन सामाजिक, मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून होत असलेल्या मागेल त्याला शिवस्मारक कार्याचा आढावा घेतला यावेळी गावातील



मित्र मंडळी भागवत सोळंके, पुरुषोत्तम सोळंके, दीपक सोळंके ,विनायक सोळंके ,मधुकर सोळंके ,गणेश सोळंके ,जिजा काशीद , राजेभाऊ सोळंके, नामदेव सोळंके ,सतीश सोळंके ,अतुल सोळंके, सूर्यकांत सोळंके,संदीप सोळंके ,विवेक सोळंके , महादेव सोळंके , अजय सोळंके सह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

---

## 12 मार्च 2025 पर्यंतच सीसीआय शासकीय कापूस खरेदी सुरु असणार - संचालक धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**

सीसीआय कडून यावर्षी हमीभावाने कापूस खरेदी ही बीड जिल्ह्यात व तालुक्यात करण्यात आलेली आहे. काही काळ सर्व्हर डाऊन असल्याने मध्यंतरी खरेदी थांबली होती. त्यातच आता सीसीआय कडून कापूस खरेदीची शेवटची तारीख जाहीर करण्यात आलेली आहे. कापूस हंगाम सण २०२४–२०२५ मध्ये सीसीआय कडून चालु असलेली



कृषी उत्पन्न बाजार समिती बीडच्या कार्यक्षेत्रातील खरेदी ही १२ मार्च २०२५ पासून बंद होणार असल्याची माहिती संचालक



धनंजय गुंदेकर यांनी दिली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

---

## रोटरी क्लब च्या वतीने रोटरी टॅलेंट सर्च परीक्षा

### १७०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नोंदवला उदंड प्रतिसाद



**माजलगाव । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी मंगलनाथ मल्टीस्टेट व यशवंत ग्रुप ऑफ एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी टॅलेंट सर्च एक्झाम चे आयोजन यशवंत विद्यालय माजलगाव व बुखारी विद्यालय माजलगाव या ठिकाणी करण्यात आले होते. या परीक्षेमध्ये माजलगाव शहरातील व परिसरातील ३ ते ९ वी या वर्गातील अनेक विद्यालयातून एकूण १७०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांचे मनोबल वाढून आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उद्देशान ▶▶ उर्वरित पान २ वर

---



*माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे लेखापाल उद्धव फपाळ साहेब यांचा येवले ज्वेलर्स मध्ये वाढदिवसानिमित्त सत्कार करताना पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम बापू येवले, ह. भ. प. गिण्यानदेव नाना गावडे, मनसे तालुकाप्रमुख धोंडीराम जाधव सिद्धेश्वर येवले, दत्ता येवले, महेश येवले, दिगंबर सपकाळ*

---

## डिजिटल मिडिया परिषदेचे राज्यस्तरीय पदाधिकारी निवडणार : प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

### मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक

**वडवणी । प्रतिनिधी**

डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी संदर्भात लवकरच एक व्यापक बैठक घेतली जाणार असुन या बैठकीसाठी राज्यभरातील डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य पदाधिकारी जिल्हा व तालुका



पदाधिकारी आणि यु ट्यूब चॅनल व पोर्टल चे संपादक,पत्रकार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे. याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी ▶▶ उर्वरित पान २ वर

---

## तहानलेल्या जीवाची तहान भागवण्यासाठी उमापूर येथे पाणपोईचे उद्घाटन

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील उमापूर येथील मार्च महिना लागला की उन्हाळा सुरू होतो. उमापूरचा आठवडी बाजार हा रविवारच्या दिवशी असतो. बाजारच्या दिवशी नेहमीच माणसांची वर्दळ असते.

वाडी, वस्ती,तांड्यावरून ,ग्रामीण भागातून येणाऱ्या वाटसरूंना पाणी मिळून त्यांची तहान भागावी त्यांचा आत्मा शांत व्हावा. याच उद्देशातून उमापूर येथील हाडाचे समाजसेवक सुभाष काळे सरांनी मार्च २०१४ मध्ये मारुती मंदिरासमोर पाणपोई



सुरू केली होती. दरवर्षी सातत्याने दर रविवारी या पाणपोईसाठी आपला अमूल्य वेळ देणारे सुभाष काळे सर. त्यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाला आज तब्बल बारा वर्षे पूर्ण झालेले आहेत. या पाणपोईच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो गरजवंताची तहान काळे सरांनी भागविलेली आहे.धान्य बँकेच्या माध्यमातून एक घास गरजवंतांना अशा प्रकारचे उपक्रमही त्यांचे सातत्याने सुरूच असते. पाणपोईचे उद्घाटन गोरक्षनाथ संस्थानचे मठाधिपती दत्ता महाराज गिरी, नामदेव महाराज माऊली संस्थान बोरी पिंपळगाव, माधव दादा पवार मनमंदिर प्रकल्पाचे संचालक शहापूर तालुका अंबड, रमेश महाराज गावडे यांच्या हस्ते करण्यात आले ▶▶ उर्वरित पान २ वर




---

दैनिक मराठवाडा पत्र

**जाहीर प्रगटन**

**फॉर्म नं. ४**

**नियतकालिकेच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५७ मधील क्रमांक ८ नियमानुसार दै. मराठवाडा पत्र वृत्तपत्राची मालकी व इतर तपशिलासंबंधी निवेदन**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | : **कबाड गल्ली सुभाष रोड, तालुका, जिल्हा बीड (महाराष्ट्र)** |
| २) प्रकाशन काळ | : **दैनिक** |
| ३) प्रकाशकाचे नाव | : **दत्तात्रय सखाराम नरनाळे** |
| ४) राष्ट्रीयत्व | : **भारतीय** |
| पत्ता | : **कबाड गल्ली सुभाष रोड, तालुका, जिल्हा बीड (महाराष्ट्र)** |
| ५) संपादकाचे नाव | : **दत्तात्रय सखाराम नरनाळे** |
| राष्ट्रीयत्व | : **भारतीय** |
| पत्ता | : **कबाड गल्ली सुभाष रोड, तालुका, जिल्हा बीड (महाराष्ट्र)** |
| ६) मालकाचे नाव | : **दत्तात्रय सखाराम नरनाळे** |
| राष्ट्रीयत्व | : **भारतीय** |
| पत्ता | : **कबाड गल्ली सुभाष रोड, तालुका, जिल्हा बीड (महाराष्ट्र)** |

मी **दत्तात्रय सखाराम नरनाळे** या निवेदनाव्दारे असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

दि.०४/०३/२०२५

स्वाक्षरीत
**दत्तात्रय सखाराम नरनाळे**
प्रकाशक